# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 10/06/2020 (बुधवार)
(सकाळ)

**ग्रामिण भागातील जनतेच्या व्यवहारीक अज्ञानाचा फायदा घेवुन त्यांचे कडील रक्कम हातसफाईने लुटणा–या टोळीस स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड.........**

गरीब तसेच शेतकरी व्यक्ती हे बॅकेंत पैसे भरण्याकरीता गेल्यावर तेथे त्यांना हेरुन भरत असलेल्या पैश्यात नकली नोटा/शाई लागली आहे असे भासवून पैसे लुटणा–या टोळीतील सदस्य नामे मो. शेख रफीक मो. शेख युसुफ, वय 50 वर्ष, रा. प्ला.नं.97, नबाबपुरा आयचीत मंदिर लकडापुल नागपूर यास दिनांक 04/06/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले होते.

आज दि. 10/06/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पहाटे 05/00वा. दरम्यान नागपुर शहरातील जरीपटका भागात एका घरावरती धाड टाकुन तेथे लपुन असलेले यापुर्वी अटक केलेला आरोपी नामे मो. शेख रफीक याचे इतर दोन साथीदार नामे 1) गोलु उर्फ मोहसिन रजा गुलाम रजा, वय 32 वर्ष व 2) हैदर अली वल्द युसुफ अली, वय 26 वर्ष, दोन्ही राहणार बी.बी. कॉलनी, खड्डा कंपनी जवळ, येरखेडा कामठी, नागपूर यांना धाडसी कारवाई करून ताब्यात घेतले.

त्यांना गुन्हया संबंधाने सखोल विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे साथीदारांसह नागपुर ग्रामिण, नागपुर शहर, तसेच जिल्हा भंडारा व चंद्रपुर येथे खालील प्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिलेली आहे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | अपराध क्रमांक व कलम | गेलेला माल |
|---|---|---|---|
| 1 | कळमेशवर | 397/20 कलम 420 भादवि | 24,000/–रू रोख रक्कम |
| 2 | काटोल | 350/20 कलम 420 भादवि | 24,000/–रू रोख रक्कम |
| 3 | रामटेक | | 11,500/–रू रोख रक्कम |
| 4 | सक्करदरा, नागपुर शहर | | 35,000/–रू रोख रक्कम |
| 5 | सिहोरा, जि. भंडारा | 189/20 कलम 380 भादवि | 82,000/–रू रोख रक्कम |
| 6 | सिटी पो.स्टे., जि. भंडारा | | 8,000/–रू रोख रक्कम |
| 7 | नागभिड, जि. चंद्रपुर | 55/20 कलम 420 भादवि | 32,000/–रू रोख रक्कम |

ग्रामीण भागात गरिब व्यक्ती तसेच शेतकरी हे जेव्हा बॅकेचा व्यवहार करण्याकरीता संबधीत बॅकेत पैसे भरणा किंवा काढण्याचे व्यवहारासाठी जातात तेव्हा तेथे नमुद आरोपी टोळी ही त्यांना हेरुन त्यांच्या अनभिज्ञतेचा व अपुऱ्या व्यवहार ज्ञानाचा गैरफायदा घेवून त्यांना त्यांच्याकडील नोटांना शाई लागल्याचे कारण अथवा नकली

नोटा, फाटक्या नोटा असे सांगुन त्यांचे लक्ष क्षणीक विचलीत करुन संबधीतांच्या नोटा आपल्या हातात घेवून मोजण्याचे बहान्याने त्यातील काही नोटा हातचलाखीने काढून घेवून उर्वरित रक्कम त्याचे स्वाधिन करणे व संबधीताच्या लक्षात घेण्यापुर्वीच तेथुन पोबारा करुन निघून जाणे अशा प्रकारे गुन्हयांची पध्दत आहे.

ग्रामिण जनतेला नुकसान पोहोचविणा—या अशा चोरटयां पासुन संरक्षण होणे महत्वाचे असल्याने, परिस्थितीचे गांभिर्य ओळखुन नागपुर ग्रामिणचे पोलीस अधीक्षक मा. राकेश ओला व अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांनी स्थानिक गुन्हे शाखेला नमुद टोळीला जेरबंद करून त्यांचे मुसक्या आवळण्यासाठी आदेशित केले होते. त्याप्रमाणे प्राप्त निर्देशा नुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार यांनी नेमलेल्या विशेष पथकाने वरिल प्रमाणे आरोपींना आज रोजी पहाटे चे सुमारास ताब्यात घेतले. नमुद आरोपींना पुढील कायदेशीर कार्यवाहीकरीता पोलीस स्टेशन काटोल यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री राकेश ओला, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच श्रीमती मोनिका राऊत, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनात श्री अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक, श्री जितेंद्र वैरागडे, सहा. पोलीस निरीक्षक, श्री नरेंन्द्र गौरखेडे, पोलीस उपनिरीक्षक, श्री सचिन मत्ते, पोलीस उपनिरीक्षक, श्री जावेद शेख, पोलीस उपनिरीक्षक तसेच स्टाफ पोहवा/सुनिल मिश्रा, नाना राऊत, राजेंद्र सनोडीया, चंद्रशेखर घडेकर, नापोशि/दिनेश आधापुरे, पोशि/अमोल वाघ, विपीन गायधने, रोहन डाखोरे, आशुतोष लांजेवार तसेच मपोशि/कविता बचले यांचे विशेष पथकाने पार पाडली.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी ग्रामीण भागातील जनतेला आवाहन केले आहे की, बॅकेच्या कोणत्याही व्यवहारा संबधाने बॅकेत गेले असता कोणीही अनोळखी इसम त्यांच्या आजूबाजुला संशायस्पदरित्या उभा असून त्याने पैश्यासंबधात कोणतेही कारण सांगून पैसे मोजण्याकरीता मागीतले किंवा आमिष दाखविले यास बळी न पडता स्वतःची सुरक्षा पाहुन आपले आर्थीक नुकसान होणार नाही याची खबरदारी बाळगावी. व असा प्रकार आढळल्यास संबधीत पोलीस स्टेशन ला माहिती दयावी.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर